

# मी ‘बेगम ऐज़ाज़ रसूल’ बोलतेय!

मी बेगम ऐज़ाज़ रसूल.

कधी काळी मला पाकिस्तानची कल्पना योग्य वाटत होती… पण आयुष्याने मला शिकवलं – धर्मापेक्षा देश मोठा, आणि राजकारणापेक्षा माणूस मोठा.

माझं मूळ नाव कदसिया. माझा जन्म २ एप्रिल १९०९ रोजी पंजाबमध्ये एका राजघराण्यात झाला. घरात संपत्ती, मान-सन्मान, राजकारणाची परंपरा – सगळं होतं. त्या काळात स्त्रियांची साक्षरता एक टक्क्याच्या आसपास असताना मला उत्तम शिक्षणाची संधी मिळाली. शिमल्याच्या कॉन्व्हेंटमध्ये आणि लाहोरच्या कॉलेजमध्ये शिकले. काही धर्मगुरूंनी फतवा काढला – “कॉन्व्हेंट शिक्षण इस्लामविरोधी आहे.” पण माझ्या वडिलांनी माझं शिक्षण थांबवलं नाही.

लहानपणी मी बुरखा घालत होते. पण मन मात्र पडद्याआड नव्हतं. १९२८ साली ‘ऑल इंडिया विमेन्स कॉन्फरन्स’च्या अधिवेशनात गेले आणि तिथे स्त्रीशिक्षण, पडदापद्धतीविरोध, बालविवाहबंदी यावर झालेल्या भाषणांनी माझ्या विचारांना नवं वळण दिलं. तेव्हाच ठरवलं – स्त्रीने स्वतःला कैद करून ठेवायचं नाही.

माझं लग्न नबाब ऐज़ाज रसूल यांच्याशी झालं आणि मी ‘बेगम ऐज़ाज़ रसूल’ झाले. लग्नानंतर मी बुरखा पूर्णपणे सोडला. सुरुवातीला विरोध झाला, पण मी ठाम राहिले. कारण मला वाटत होतं – जर मी स्वतः मुक्त नसेन, तर इतर स्त्रियांच्या स्वातंत्र्याबद्दल कसं बोलणार?

१९३७ साली मी संयुक्त प्रांताच्या विधानसभेत निवडून आले – तेही सर्वसाधारण, बिगर-राखीव जागेवरून. मुस्लिम समाजातली स्त्री, तीही बुरखा न घालणारी, पुरुषांविरुद्ध निवडणूक लढवते आहे – हे अनेकांना रुचलं नाही. माझ्याविरुद्ध फतवे काढले गेले. पण लोकांनी मला मत दिलं. कारण त्यांना माझा आत्मविश्वास दिसत होता.

मी स्वतः जमीनदार घराण्यातली होते, तरी सभागृहात उभी राहून जमिनदारी पद्धत संपवण्याचा

आग्रह धरला. कारण न्याय हा रक्तसंबंधांपेक्षा मोठा असतो. शेतात घाम गाळणाऱ्यांचा हक्क त्यांनाच मिळायला हवा, असं मी स्पष्ट सांगितलं.

हो, मी मुस्लिम लीगमध्ये होते. मला वाटत होतं – मुस्लिम समाजाच्या प्रगतीसाठी स्वतंत्र राष्ट्र गरजेचं आहे. पण फाळणीच्या काळात जे रक्तपात, दंगली, विस्थापन पाहिलं… तेव्हा माझ्या मनात प्रश्न निर्माण झाले. संयुक्त प्रांतातील गरीब मुस्लिमांना पाकिस्तानला जाणं शक्यच नव्हतं. त्यांचं आयुष्य, त्यांची माती, त्यांची उपजीविका इथेच होती. मोठे नेते पाकिस्तानला गेले, पण सामान्य लोक इथेच राहिले – असुरक्षित. तेव्हा मी ठरवलं – मी भारतातच राहणार. मी भारतीय म्हणूनच काम करणार.

१९४६ साली मी संविधानसभेवर निवडून आले. तिथे एक मोठा प्रश्न होता – स्वतंत्र मतदारसंघ आणि अल्पसंख्याकांसाठी राजकीय आरक्षण ठेवायचं का? मी ठामपणे विरोध केला. मी म्हणाले – “हे उपाय अल्पसंख्याकांना वेगळं ठेवतील, मजबूत करणार नाहीत.”

अल्पसंख्याकांनी बहुसंख्याकांवर विश्वास ठेवला पाहिजे, आणि बहुसंख्याकांनीही अल्पसंख्याकांना सुरक्षिततेची जाणीव दिली पाहिजे – हाच खरा धर्मनिरपेक्ष भारताचा पाया आहे.

पुढे मी मुस्लिम लीग सोडून काँग्रेसमध्ये प्रवेश केला. राज्यसभेची सदस्य झाले. उत्तर प्रदेशात मंत्री म्हणून काम केलं. महिला हॉकी संघटनांमध्येही काम केलं. सार्वजनिक जीवनात स्त्रियांनी पुढे यावं, हे माझं स्वप्न होतं.

२००० साली मला पद्मभूषण सन्मान मिळाला. पण माझ्यासाठी खरी ओळख कोणती? मी मुस्लिम आहे, जमीनदार घराण्यातली आहे, राजकारणी आहे – यापेक्षा मोठी ओळख एकच – मी भारतीय आहे.

माझा विश्वास असा होता आणि आहे – ‘अल्पसंख्याक’ आणि ‘बहुसंख्याक’ या शब्दांच्या पलीकडे जाऊन आपण स्वतःला ‘भारतीय’ म्हणून ओळखलं, तरच देश मजबूत होईल.

आजही जर तुम्ही मला विचारलंत – माझं आयुष्य कशासाठी होतं? तर मी सांगेन – भेद मिटवण्यासाठी, विश्वास निर्माण करण्यासाठी, आणि भारताला एकसंध ठेवण्यासाठी.